शासन स्तरावरून कार्यमुक्त करण्याबाबत.
श्री. वि. शं. टोळ, लेखाधिकारी संवर्ग.

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
शासन आदेश, क्रमांक:- संलेको-२०१८/प्र.क्र.१४६/कोषा प्रशा- २
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक :- ३० जुलै, २०१८.

वाचा :- संचालक, लेखा व कोषागारे यांचे आदेश क्र. संलेको/०५.२०१८/ प्रशा राप/ का-४/ शुध्दीपत्रक/४७९, दि. ३१ मे, २०१८.

**-: शासन आदेश :-**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखाधिकारी संवर्गातील श्री. विवेक शंकर टोळ, लेखाधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांची संदर्भाधीन आदेशान्वये लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा कोकण व पुणे विभाग, उपविभाग- २, नवी मुंबई या पदावर बदली करण्यात आली आहे व त्यांचे जागी श्री. विनित ना. पवार यांची बदली करण्यात आली आहे.

२. श्री. टोळ यांचे बदली आदेशास जवळपास २ महिन्यांचा कालावधी झाला आहे. तसेच त्यांचे जागी पर्यायी अधिकारी दिला आहे. तथापि, अद्याप श्री. टोळ यांना सध्याच्या कार्यरत पदावरुन कार्यमुक्त करण्यात आले नाही. या आदेशान्वये श्री. टोळ यांना बदलीच्या पदावर हजर होण्याकरीता दि. ३१ जुलै, २०१८ (म.नं.) पासून शासन स्तरावरून कार्यमुक्त करण्यात येत आहे.

३. श्री. टोळ यांनी सदर आदेशानुसार तात्काळ बदलीच्या पदावर हजर व्हावे. त्यांसंबंधीचा रूजू अहवाल संचालनालय व शासनास तात्काळ सादर करावा. हे आदेश तात्काळ अमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(माधवी गांधी)
**अवर सचिव, वित्त विभाग.**

प्रति -
१. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.*
२. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.*
३. महालेखापाल- १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई नागपूर.*
४. संबंधित अधिका-यांचे नियंत्रक अधिकारी / सध्याचे कार्यालय प्रमुख.*
५. संबंधित अधिकारी *
६. निवडनस्ती कोषा प्रशा- १ व २ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(* संचालक, ले व को, संचालनालय, मुंबई यांचेमार्फत)